**[वेळ : २.३० तास ]** **[गुण : ७५]**

कृपया तुम्हाला योग्य प्रश्नपत्रिका मिळाली आहे का ते तपासा.

**सूचना : १. सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.**
**२. अंतर्गत पर्याय लक्षात घ्या.**
**३. प्रश्नासमोरील अंक गुण दर्शवितात.**

**प्र. १ अ.** म. जोतिराव फुले यांच्या धार्मिक व सामाजिक विचारांतून दिसणाऱ्या परिवर्तनवादी तत्त्वांचा आढावा घ्या. **१५**

**किंवा**

**ब.** महिलांविषयक व कामगारविषयक डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची भूमिका कशा स्वरूपाची होती त्याचे विवेचन करा.

**प्र. २ अ.** फुले-आंबेडकरवादी साहित्याचे स्वरूप सांगून या साहित्य निर्मितीच्या प्रेरणास्थानाची चर्चा करा. **१५**

**किंवा**

**ब.** फुले-आंबेडकरवादी साहित्य परंपरेत कविता आणि नाट्य लेखनाने कोणती भर टाकली त्याचे साधार विवेचन करा.

**प्र.३ अ.** ग्रामीण संस्कृतीतील वाढत्या प्रतिकूलतेला 'विषवृक्षाच्या मुळ्या' ही कादंबरी कशी साक्षात करते त्याचे विवेचन करा. **१५**

**किंवा**

**ब.** 'आरपार लयीत प्राणांतिक' या दीर्घ कवितेतून विठाबाई यांच्या चारित्राच्या आधारे 'फुले-आंबेडकरवाद'कसा मांडला आहे त्याची चर्चा करा.

**प्र.४ प्रत्येक गटातील एक टीप लिहा. (एकूण तीन)** **१५**

**अ. १.** महात्मा फुले आणि विज्ञाननिष्ठ विचार

**किंवा**

**२.** शिक्षण क्षेत्रातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान

**ब. १.** फुले-आंबेडकरी साहित्य व वैचारिक साहित्य

**किंवा**

**२.** फुले-आंबेडकरवादी साहित्याचे विशेष



XROYADMINY79BB64XROYADMINY79BB64XROYADMINY79BB64XROYADMINY79BB64

**क.१.** 'विषवृक्षाच्या मुळया' या कादंबरीतील नायक – विश्वनाथ तरटे

**किंवा**

**२.** 'आरपार लयीत प्राणांतिक' चे अभिव्यक्ती विशेष

**प्र.५ प्रत्येक गटातील एका प्रश्नाचे थोडक्यात उत्तरे लिहा. (एकूण तीन) १५**

**अ.१.** म. फुले यांच्या धर्मचिंतनाचे विवेचन करा.

**किंवा**

**२.** डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेल्या शेतीविषयक विचारांचा आढावा घ्या.

**ब. १.** फुले-आंबेडकरी साहित्यातील कादंबरी लेखनाची वाटचाल नमूद करा.

**किंवा**

**२.** फुले-आंबेडकरी साहित्याच्या पूर्व परंपरेचा आढावा घ्या.

**क.१.** ‘विषवृक्षाच्या मुळया’ या कादंबरीचे भाषा व शैलीविशेष नोंदवा.

**किंवा**

**२.** 'आरपार लयीत प्राणांतिक' मधून व्यक्त होणारे लिंग भेदाचे वास्तव अधोरेखित करा.

--------------------------------



XROYADMINY79BB64XROYADMINY79BB64XROYADMINY79BB64XROYADMINY79BB64